## प्रथम श्रेणी बाष्पक परिचारक परीक्षेकरिता आवश्यक अर्हता व अनुभव.

१. प्रथम श्रेणी बाष्पक परिचारक अर्जदाराचे वय २० वर्षापेक्षा कमी नसावे

२. द्वितीय श्रेणी बाष्पक परिचारक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अर्जासोबत सदर प्रमाणपत्राची स्वयं सांक्षाकित छायाकिंत प्रत जोडावी.

३. ज्या बाष्पकाची तपनक्षमता ही ५० मी$^{२}$ किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा बाष्पकावर व्दितीय श्रेणी बाष्पक परिचर म्हणून स्वतंत्रपणे सलग दोन वर्ष कामाचा अनुभव असावा.

**किंवा**

४. प्रथम श्रेणी बाष्पक परिचारकाच्या अधिपत्याखाली काम करणाऱ्या व्दितीय श्रेणी बाष्पक परिचारक प्रमाणपत्र धारण करणाऱ्या उमेदवारास किमान दोन वर्षे सेवेचा अनुभव असणे आवश्यक आहे. ज्या बाष्पकावर काम करीत आहे, त्याची तपनक्षमता ही कमीतकमी ५० मी$^{२}$ असणे आवश्यक आहे.

**किंवा**

५. मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्था ( तांत्रिक संस्था) यांचे प्रमाणपत्र धारण करणारा, ज्यांनी तीन वर्षाचे औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण केले असून, त्यापैकी एक वर्षाचा कालावधी हा त्यांनी बाष्पके असणा-या कारखान्यामध्ये **अथवा** तांत्रिक कार्यशाळेमध्ये जिथे इंजिन आणि बाष्पके दुरुस्तीची काम केली जातात अशा ठिकाणी शिकाऊ उमेदवार म्हणून प्रत्यक्ष काम केलेला असावा. या कामाबरोबर त्यांने किमान एक वर्ष स्वतंत्ररित्या ५० मी$^{२}$ किंवा त्यापेक्षा जास्त तपनक्षमता असलेल्या बाष्पकावर व्दितीय श्रेणी बाष्पक परिचारक म्हणून काम केलेले असावे.

## उमेदवारांसाठी सर्वसाधारण सुचना.

१ बाष्पक परिचारक परीक्षेचे शुल्क रु.५००/- ई-पेमेंटने ऑन लाईन पध्दतीने (www.gras.mahakosh.gov. in) जमा करावे व मूळ चलनाची प्रत अर्जा सोबत जोडावी.

२ ज्या प्रमाणपत्रात (दाखल्यात) उमेदवाराची जन्मतारीख, त्याचे जन्मस्थळ व तो भारताचा नागरीक आहे असा उल्लेख केलेले, तालुका, जिल्हा, अप्पर जिल्हा दंडाधिकारी, अप्पर महानगर दंडाधिकारी मुंबई यांनी दिलेले भारतीय नागरीकत्वाचे प्रमाणपत्राची स्वयं साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य आहे.

३ शैक्षणिक अर्हता, वय व नागरीकत्व इत्यादी प्रमाणपत्रांच्या प्रती स्वयं साक्षांकित केलेल्या असाव्यात. स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र **(Self Declaration)** प्रपत्र-ब, अर्जासोबत जोडण्यात यावे, नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

४ अनुभवाचे (सेवा) प्रमाणपत्र या अर्जासोबत दिलेल्या नमुन्याप्रमाणेच असावे व यातील सर्व तपशील हा आपण ज्या विभागात कार्यरत आहात, तेथील बाष्पकांचे निरीक्षण करणा-या विभागीय अधिका-याकडून पडताळणी केलेले असावे व त्यावर त्यांची सही व शिक्का असावा. असे सेवा प्रमाणपत्र त्याच्या मूळ प्रतीसह आणि छायांकित प्रतीसह अर्जास जोडलेले असावे, नसल्यास आपला अर्ज नाकारण्यात येईल.

५ उमेदवाराने स्वतःचे अलिकडील तीन रंगीत छायाचित्रे, ज्यांची छायाचित्रातील मागील बाजू पांढरी असावी व त्याचा आकार हा ६५ मी.मी. उभा X ५० मी.मी. आडवा असा असावा व यापैकी एक रंगीत छायाचित्र अर्जावर दर्शविण्यात आलेल्या चौकटीत चिकटवून त्यावर स्वतःची स्वाक्षरी करण्यात यावी. उर्वरित दोन छायाचित्रांच्या मागील बाजूस उमेदवाराने स्वतःचे नांव व स्वाक्षरी करुन ती बंद लिफाफामध्ये घालून अर्जासोबत जोडावे.

६ अर्जासोबत सादर केलेल्या सर्व स्वयं साक्षांकित प्रमाणपत्रांची मूळ प्रमाणपत्रे ही मूलाखतीच्या वेळी सादर करणे अनिवार्य असेल.

७ अर्जासोबत शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत वैद्यकीय अधिकारी किंवा नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी (Registered Medical Practitioner) यांनी दिलेले शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्र जोडण्यात यांवे. नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायी यांनी दिलेल्या शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्रावर त्यांचा वैद्यकीय नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.

८ अर्ज पाठविण्याचा पत्ता :- संचालक, बाष्पके संचालनालय, महाराष्ट्र राज्य, कामगार भवन, ७वा मजला, प्लॉट क्रं.सी-२०, ब्लॉक- ई, बांद्रा कुर्ला संकुल, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक -०२२-२६५७१२०१/२६५७१३०४

९ पात्र उमेदवारांना प्रवेशपत्र प्राप्त झाल्यानंतर, सदर प्रवेशपत्रावर अर्जासोबत जोडण्यात आलेल्या छायाचित्राप्रमाणेच स्वतःचे छायाचित्र चिकटवावे व त्यावर आपण ज्या कंपनीत सध्या कार्यरत आहात त्या कंपनीने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची सही व शिक्का घेण्यात यावा. तसेच पात्रता यादीत नांव असलेल्या पात्र उमेदवारास विहित मुदतीत प्रवेश पत्र मिळाले नाही, अशांनी परीक्षेचे वेळी आपण ज्या कंपनीत कामास आहात, तेथील त्यांचे स्वतःचे छायाचित्र असेलेले आस्थापनाचे ओळखपत्र सोबत घेवून यावे.

उप संचालक, बाष्पके आणि
सचिव, परीक्षक मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.